**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सांगली    **P.S.(ठाणे):** तासगांव

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0076    **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**24/02/2026 04:32

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिंनाक पासून):** 29/01/2026
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 23/02/2026
**Time From (वेळेपासून):** 12:13 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:42 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 24/02/2026    **Time (वेळ):** 03:06 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 24/02/2026 03:06 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 10 किमी    **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तलाठी कार्यालय शिरगाव वि

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्यांच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्रीमती यास्मीन इनामदार पोलीस उप अधीक्षक

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1986

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, ,सांगली,तासगांव,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, ,सांगली,तासगांव,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9527904700

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संजय शंकर पवार | | | 1. रा शिरगाव,तासगांव,सांगली, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
वर्दीजबाब दि. 24.02.2026

मी श्रीमती यास्मीन इनामदार, वय - 40 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली, मो.न. 9527904700.
सरकारतर्फे फिंयादी होवून देते फिंयादी जबाब की, मी पोलीस उप अधीक्षक या पदावर अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली येथे कार्यरत आहे.
दि. 28/01/2026 रोजी 11.11 वा चे सुमारास तक्रारदार श्री. बालाजी विष्णु गायकवाड, रा.शिरगाव, ता. तासगाव जि.सांगली यांनी आम्हास संपर्क करून त्यांची कोतवाल संजय पवार तलाठी कार्यालय शिरगाव यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रारी कळविली.
त्यावेळी मी तक्रारदार यांना पथकासह दिंनाक 29.01.2026 रोजी 11.00 वा. तासगाव येथे येत असलेचे सांगून आलेनंतर संपर्क केल्यानंतर हजर राहणेच्या व गोपनियता राखणेच्या सुचना दिल्या.
दि. 29.01.2026 रोजी 09.00 वा आम्ही कार्यालयात हजर असताना तक्रारदार यांचे लाच मागणी कारवाई करीता आवश्यक पंचसेवा उपलब्ध होणेकरीता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांना पंचसेवा उपलब्ध होणेबाबत पत्रव्यवहार करून दोन्ही पंचांचे संपर्क क्रमांक प्राप्त करून त्यांना लागलीच एसीबी कार्यालयात हजर राहणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे दोन्ही पंच इकडील कार्यालयात 09.45 वा चे सुमारास आमचे समक्ष हजर झालेत.
त्यानंतर मी दोन्ही पंचांना एक लोकसेवक यांचेविरूध्द लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करुन लाचलुचपतीचा सापळा लावावयाचा आहे, त्याकामी पंच साक्षीदार म्हणून काम करण्यास तयार आहात का, असे विचारता, दोन्ही पंचानी पंच म्हणून काम करण्यास संमती दिली.
त्यानंतर मी, दोन्ही पंच, पोना/प्रितम चौगुले, पोकॉ/अजित पाटील, पोशि/चंद्रकांत जाधव व चालक रजपूत असे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, व्हिडीओ रेकॉर्डर, मेमरी कार्ड, लॅपटॉप, पिंरटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, अॅथ्रासिन पावडर, काळे रंगाचे कापड, साबण व इतर आवश्यक साहित्य घेऊन शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो नं. एमएच-10-डीक्यु-9530 मधून कार्यालयातून 09.50 वाजता रवाना होवून स्टेशन चौक, एमआयडीसी, सावळी मार्गे, कुमठेफाटा, तासगाव येथून जात असताना आम्ही तक्रारदार यांना संपर्क करून आमचे वाहनाचे वर्णन सांगून त्यांना तासगाव ते विटा जाणारे रोडलगत विसापूर फाटा येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही तासगाव येथून तासगाव ते विटा जाणारे रोडने विसापूर फाटा येथे रोडलगत सुरक्षित ठिकाणी 10.40 वा चे सुमारास दाखल झालो. आम्ही दिले सुचेनप्रमाणे काही वेळाने तक्रारदार श्री. बालाजी गायकवाड हे त्यांचेकडील टीव्हीएस इलेक्टीक मोपेड क्र.एमएच-10-ईजे-8791 वरून आमचे समक्ष हजर झालेत.
त्यानंतर मी तक्रारदार श्री. गायकवाड यांना आमचेकडील वाहनात बसणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार हे आमचेकडील वाहनामध्ये बसले.
त्यानंतर मी तक्रारदार श्री. गायकवाड यांची दोन्ही पंचांची व सापळा पथकातील अंमलदार यांची एकमेकात ओळख करुन दिली. त्यानंतर मी सदर कारवाईसाठी श्री. चंद्रकांत गणपती नागरगोजे यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री. चंद्रकांत दत्तात्रय भंडारे यांनी पंच नं.2 म्हणुन काम करण्याचे ठरवले.वर्दी जबाब दि. 24.02.2026

मी श्रीमती यास्मीन इनामदार, वय - 40 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली, मो.न. 9527904700.
सरकारतर्फे फिंयादी होवून देते फिंयादी जबाब की, मी पोलीस उप अधीक्षक या पदावर अॅन्टी करप्शन ब्युरो,



Scanned with OKEN Scanner

सांगली येथे कार्यरत आहे.

दि. 28/01/2026 रोजी 11.11 वा चे सुमारास तक्रारदार श्री. बालाजी विष्णु गायकवाड, रा.शिरगाव, ता. तासगाव जि.सांगली यांनी आम्हास संपर्क करून त्यांची कोतवाल संजय पवार तलाठी कार्यालय शिरगाव यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रारी कळविली.

त्यावेळी मी तक्रारदार यांना पथकासह दिंनाक 29.01.2026 रोजी 11.00 वा. तासगाव येथे येत असलेचे सांगून आलेनंतर संपर्क केल्यानंतर हजर राहणेच्या व गोपनियता राखणेच्या सुचना दिल्या.

दि. 29.01.2026 रोजी 09.00 वा आम्ही कार्यालयात हजर असताना तक्रारदार यांचे लाच मागणी कारवाई करीता आवश्यक पंचसेवा उपलब्ध होणेकरीता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांना पंचसेवा उपलब्ध होणेबाबत पत्रव्यवहार करून दोन्ही पंचांचे संपर्क क्रमांक प्राप्त करून त्यांना लागलीच एसीबी कार्यालयात हजर राहणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे दोन्ही पंच इकडील कार्यालयात 09.45 वा चे सुमारास आमचे समक्ष हजर झालेत.

त्यानंतर मी दोन्ही पंचांना एक लोकसेवक यांचेविरूध्द लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करुन लाचलुचपतीचा सापळा लावावयाचा आहे, त्याकामी पंच साक्षीदार म्हणून काम करण्यास तयार आहात का, असे विचारता, दोन्ही पंचानी पंच म्हणून काम करण्यास संमती दिली.

त्यानंतर मी, दोन्ही पंच, पोना/प्रितम चौगुले, पोकॉ/अजित पाटील, पोशि/चंद्रकांत जाधव व चालक रजपूत असे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, व्हिडीओ रेकॉर्डर, मेमरी कार्ड, लॅपटॉप, पिंटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, अंथ्रासिन पावडर, काळे रंगाचे कापड, साबण व इतर आवश्यक साहित्य घेऊन शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो नं. एमएच-10-डीक्यु-9530 मधून कार्यालयातून 09.50 वाजता रवाना होवून स्टेशन चौक, एमआयडीसी, सावळी मार्गे, कुमठेफाटा, तासगाव येथून जात असताना आम्ही तक्रारदार यांना संपर्क करून आमचे

त्यानंतर तक्रारदार श्री. गायकवाड यांनी त्यांची लाच मागणीची तक्रार पंचांसमक्ष थोडक्यात कथन केली. त्यामध्ये तक्रारदार यांचे वडीलांनी गहाणस्वरूपी मुदत खरेदी दिलेल्या जमिनीची तक्रारदार हे वारस या नात्याने त्यांनी रिकन्व्हीयन्स पत्राव्दारे खरेदी केलेल्या जमिनीची नोंद तलाठी शिरगाव यांना सांगून मंजूर करण्याकरीता कोतवाल संजय पवार, तलाठी कार्यालय शिरगाव यांनी तक्रारदार यांचेकडे 15,000/- रूपये लाचेची मागणी केली आहे वगैरे हकीकत सांगीतले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. गायकवाड यांना ब्युरोच्या कार्यप्रणालीबाबत माहिती देवून त्यांना त्यांचा तक्रारी अर्ज देण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. गायकवाड यांनी त्यांचा हस्तलिखीत लाच मागणीचा तक्रारी अर्ज आमचे समक्ष हजर केला.

सदर तक्रारी अर्जाचे अवलोकन करता त्यामध्ये "मी शिरगाव येथे माझे कुटुंबासह राहण्यास आहे. माझे वडील विष्णु रामू गायकवाड यांनी आमचे शिरगाव येथील गट नं.435 मधील क्षेत्र 0.37 हे.आर. शेतजमिन आमचे गावातील विलास नारायण पाटील यांस 50,000/- रुपयास गहाणस्वरूपी मुदतखरेदीने 5 वर्ष मुदती करीता दुय्यम निंबधक कार्यालय, तासगाव येथे दि.29/12/2010 रोजी दस्त क्र.4080/2010 अन्वये दस्त करुन दिली होती.

त्यानंतर माझे वडील विष्णु रामू गायकवाड यांनी वरील मिळकतीवर विलास नारायण पाटील यांचेकडून आणखीन 30,000/- रूपये घेवून जादा बोजा व मुदत गहाण खरेदीपत्र दुय्यम निंबधक कार्यालय, तासगाव येथे दि. 01/10/2011 रोजी दस्त क्र.2692/2011 अन्वये केले. त्यानंतर सदर मिळकतीवर वडील विष्णु रामू गायकवाड यांनी विलास नारायण पाटील यांचेकडून आणखीन 20,000/- रूपये जादा बोजा घेवुन अशी एकुन 100000/- रुपये हे मुळ खरेदीपत्रा पासुन 15 वर्ष म्हणजे दि.28.12.2025 पर्यंतचे जादा बोजा मुदत गहाण खरेदीपत्र दुय्यम निंबधक कार्यालय, तासगाव कार्यालय येथे दि.17/11/2012 रोजी दस्त क्र.3595/2012 केला आहे.

माझे वडील विष्णु रामू गायकवाड हे दि.01/11/2018 रोजी मयत झाले आहेत. त्यानंतर मी व माझी बहिण सौ. कविता संतोष पाटील असे दोघांनी माझे वडीलांनी वरील मिळकतीचे केले गहाणखत हे विलास नारायण पाटील यांना 100000/- रुपये देवुन रिकन्व्हेन्स पत्राव्दारे दुय्यम निंबधक कार्यालय, तासगाव येथे दि.30.12.2025 रोजी दस्त क्र.6422/2025 अन्वये दस्त करुन लिहून घेतले आहे.

दि.01.01.2026 रोजी मी रिकन्व्हेन्स पत्रा द्वारे करुन घेतलेल्या दस्ताचे नोंदी संदर्भात चौकशी करण्यासाठी तलाठी कार्यालय शिरगाव येथे जावून कोतवाल संजय पवार यांची भेट घेवुन सात बारा उता-यावर रिकन्व्हेन्स पत्राद्वारे केलेल्या दस्ताची नोंद करणे बाबतचा अर्ज व त्यासोबत रिकन्व्हेन्सपत्राद्वारे केलेल्या दस्ताची छायांकीत प्रत इत्यादी कागदपत्रे दिली. त्यावेळी कोतवाल संजय पवार यांनी आम्ही रिकन्व्हेन्स पत्राद्वारे केलेल्या दस्ताची नोंद तलाठी यांना सांगून धरणेसाठी माझ्याकडे 15,000/- रूपयेची मागणी केली. त्यावेळी मी कोतवाल संजय पवार



Scanned with OKEN Scanner

यांना माझी परिस्थीती अत्यंत बिकट असून माझे वडीलांनी गहाण ठेवलेली जमिन रिकन्व्हेन्सपत्राद्वारे दस्त करून घेतली असल्याचे सांगितले. त्यावेळी कोतवाल संजय पवार यांनी मला पैसे नाही दिले तर तलाठी व सर्कल नोंद मंजूर करणार नाहीत अशी भिती घातली.

त्यानंतर मी आमचे शेतजमिनीचे रिकन्व्हेन्सपत्राद्वारे करुन घेतलेल्या दस्ताची नोंद मंजूर होणेची वाट पाहिली परंतू अद्याप पर्यंत आमचे शेतजमिनीचे रिकन्व्हेन्स पत्राद्वारे करुन घेतलेल्या दस्ताची नोंद झालेली नाही.
आज रोजी मी तलाठी कार्यालय शिरगाव येथे जावून कोतवाल संजय पवार यांची भेट घेवून कामा संदर्भात चर्चा करणार आहे. त्यावेळी कोतवाल संजय पवार हे माझ्याकडे 15,000/- रुपये लाचेची मागणी करतील याची मला खात्री आहे. मला कोतवाल संजय पवार यांना लाच देण्याची इच्छा नाही.
माझेत व कोतवाल श्री संजय पवार यांचेत कोणताही उसनवारीचा व्यवहार अगर आपआपसात कोणताही भांडणतंटा नाही. तरी त्यांचेवर कारवाई व्हावी ही विंनती." अशी हकीकत अर्जामध्ये नमूद आहे.

त्यानंतर मी सदर तक्रारी अर्जावर सही केली. त्यानंतर मी तक्रारदार श्री. गायकवाड यांचा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचांनी तक्रारी अर्ज वाचून तक्रारदार यांनी तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जामधील मजकूर एकच असल्याची खात्री करून तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी सह्या केल्या.
त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करुन लोकसेवक श्री.संजय पवार, कोतवाल यांचेविरूध्द लाचलुचपतीची सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यामध्ये नविन एक मेमरीकार्ड घालून मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याचे खात्री करून दिली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. गायकवाड व पंच क्र.1 चंद्रकांत नागरगोजे यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी 11.37 वाजता माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे पडताळणी कारवाई वेळचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये तसेच सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर मी तक्रारदार व पंच नं.1 यांना दिले सुचनांची उजळणी करून दिली.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 12.13 वाजता सुरु करुन तक्रारदार गायकवाड यांचेकडे देवून तो त्यांचे गळ्यामध्ये अडकविण्याचा इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी रेकॉर्डरला असले लेसव्दारे तो त्यांचे गळ्यामध्ये अडकविला.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. गायकवाड व पंच नं.1 श्री. नागरगोजे यांना तलाठी कार्यालय शिरगाव येथे कोतवाल संजय पवार यांची भेट घेणेकरीता रवाना होणे बाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार श्री.गायकवाड व पंच नं.1 श्री.नागरगोजे असे तक्रारदार यांचेकडील टीव्हीएस इलेक्टीक मोपेड क्र.एमएच-10-ईजे-8791 वरून रवाना झाले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. गायकवाड व पंच नं.1 नागरगोजे असे आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो मी 13.18 वाजता बंद करून माझे ताबेत घेतला. त्यानंतर मी, पंच नं 1 श्री. नागरगोजे यांना, श्री.संजय पवार यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं 1 यांनी हकीगत सांगीतली की, "आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील मो.सा वरून रवाना होवून शिरगाव गावामध्ये तलाठी कार्यालयाजवळ दाखल झालो. त्यावेळी तलाठी कार्यालय बंद असल्याने तक्रारदार श्री.गायकवाड यांनी त्यांचे मोबाईलवरून कोतवाल संजय पवार यांना फोन केला. त्यावेळी कोतवाल संजय पवार यांनी तक्रारदार यांना ग्रामपंचायत कार्यालयाजवळ येण्यास सांगितल्याने आम्ही ग्रामपंचायत कार्यालय जवळ जावून कोतवाल संजय पवार यांची भेट घेतली. त्यावेळी कार्यालयाचे बाहेर स्पिकरचा आवाज येत असल्याने तक्रारदार यांनी कोतवाल संजय पवार यास दुसरीकडे जावून बोलूया असे म्हणाले असता कोतवाल पवार यांनी तक्रारदार यांना चावडी (तलाठी कार्यालय शिरगाव) येथे जावूया असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार व मी असे ग्रामपंचायत कार्यालय येथून आमचे मो.सा. वरून व कोतवाल पवार हे त्यांचेकडील मो.सा. वरून रवाना होवून तलाठी कार्यालय शिरगाव येथे दाखल झालो. त्यावेळी कोतवाल पवार यांनी तलाठी कार्यालयाचे कुलूप उघडून आम्ही कार्यालयामध्ये गेलो.

त्यावेळी तक्रारदार व कोतवाल पवार हे तक्रारदार यांचे नोंदीबाबत चर्चा करू लागले. त्यावेळी कोतवाल संजय पवार यांनी तक्रादार यांना "लिंब गावातील राजेश हिंदुराव पाटील यांचे नोंदीच्या प्रकरणाबाबत चर्चा करून त्यांचेकडून पंधरा हजार रुपये घेतले संदर्भात चर्चा करून "खरेदी पत्राची नोंदीची लेव्हल दाखवली" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी कोतवाल पवार यांना "आमची परिस्थीती नसल्याचे सांगितले असता कोतवाल पवार यांनी त्यांना "तुमच .....तुमच्या हान करा की तुम्ही.... तुमच्या हान सांगा कि बाबा किती द्याव लागतील" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी कोतवाल यांनाच रक्कम सांगणेची विंनती केली. त्यावेळी कोतवाल संजय पवार यांनी



Scanned with OKEN Scanner

"आण्णसाहेंबांना आणी ती द्यावी लागत्याती..... सर्कलना..... पाच - पाच हजार तर दयावी लागतील" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना सर्कल यांना फोन लावून देण्याची विंनती केली असता कोतवाल यांनी सर्कल इलेक्शन डयुटीमध्ये असल्याचे सांगून फोन करण्यास नकार दिला.
त्यानंतर तक्रारदार यांनी कोतवाल यांना पुन्हा रक्कम कमी करणेची विंनती केली असता कोतवाल पवार यांनी तक्रारदार यांना "दहा देवुन टाका विषय संपवुन टाका........संपवुन टाका मागार काय काय सांगयच ते सांगतो त्यासनी ... एवढच हायती" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना "कितीत करणार खर सांगा" असे विचारले. त्यावर कोतवाल पवार यांनी "प्रामाणीक पणे सांगीतलेले..आत्ता हि तुम्हाला दाखविल आपण..

खरेदीच नोंदी असुदे, कुठल्याही वाटणीपत्राच्या नोंदी असुदे..... पंधराच्या आत आकडा नसतोय" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "पंधरा हजार" असे विचारले असता कोतवाल यांनी "हा" असे म्हणाले.
त्यानंतर तक्रारदार यांनी कोतवाल यांना तलाठी साळुंखे यांचा मोबाईल नंबर विचारून "तुमच आणी त्यांच बोलण झालय ना..... पेमेंट विषय बोलला का त्यांना" असे विचारले असता कोतवाल पवार यांनी "झालय झालय.... चर्चा झाल्या सगळी" असे म्हणून "तलाठी व सर्कल इलेक्शन डयुटीमध्ये असल्याचे सांगितले.
त्यानंतर तक्रारदार यांनी कोतवाल यांना सातबारा बनायला किती दिवस लागतील? असे विचारले असता कोतवाल यांनी "20 ते 22 दिवस" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवरून साळुंखे तलाठी यांना फोन करून फोन स्पिकर मोडवर घेतला. त्यावेळी तक्रारदार यांनी साळुंखे तलाठी यांना त्यांचे नाव गाव सांगून त्यांचे काम सांगितले. त्यावेळी तलाठी साळुंखे यांनी तक्रारदार यांना ते इलेक्शन डयुटीचे कामामध्ये व्यस्त असल्याचे सांगून फोन कट केला.
त्यानंतर तक्रारदार व कोतवाल पवार यांचेतील तक्रारदार यांचे नोंदी संदर्भात चर्चा झाली. त्यानंतर त्यांचेतील बोलणे झालेनंतर तक्रारदार व मी तेथून रवाना होवून आपणासमक्ष हजर झालो" वगैरे हकीकत पंच नं.1 नागरगोजे यांनी सांगितली.
त्यानंतर मी तक्रारदार श्री. गायकवाड यांना पडताळणी कारवाईची हकिकत विचारली असता तक्रारदार यांनी पंच नं. 1 यांचे हकिकत प्रमाणे हकिकत सांगीतली. तसेच तक्रारदार यांचे त्यांचे मो.क्र. 8308045245 वरून तलाठी कार्यालयजवळ गेलेवर कोतवाल संजय पवार यांचे मो.क्र. 9518309426 वर फोन केला असल्याचे हकीकत सांगितली. तसेच तलाठी यांचे मो.क्र. 9665240881 यावर फोन केला असल्याची हकीकत सांगितली.
त्यानंतर आम्ही डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी तक्रारदार श्री. गायकवाड व संजय पवार यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 002 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.
पडताळणी कारवाई मध्ये, कोतवाल संजय पवार यांनी तक्रारदार यांनी रिकन्व्हीयन्स पत्राव्दारे खरेदी केलेल्या जमिनीची नोंद, तलाठी व सर्कल यांना सांगून 7/12 सदरी लावण्यासाठी तलाठी व सर्कल यांचे नावाने तक्रारदार यांचेकडे 15,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही कोतवाल संजय पवार यांचे लाच मागणी कृत्यामध्ये श्री.साळंुखे तलाठी शिरगाव यांचा सहभाग आहे अगर कसे? याची पडताळणी करण्याचे सर्वानुमते निश्चित केले.
श्री.साळुंखे तलाठी शिरगाव हे निवडणुकीचे कामानिमीत्त तहसिल कार्यालय तासगाव येथे असल्याने तक्रारदार गायकवाड व पंच नं.1 नागरगोजे यांना तहसिल कार्यालय तासगाव येथे पाठवून त्यांचेकडे पाठवून पडताळणी करण्याचे निश्चित केले. तक्रारदार श्री.गायकवाड व लोकसेवक श्री.साळुंखे तलाठी यांचेत होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्याचे निश्चित केले.
त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये फाईल क्रमांक आरईसी 001 व 002 हया सेव्ह असल्याच्या खात्री करून दिल्या.
त्यानंतर मी तक्रारदार श्री. गायकवाड व पंच क्र.1 चंद्रकांत नागरगोजे यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या.
त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.00 वाजता सुरु करून तक्रारदार गायकवाड यांचेकडे देवून तो त्यांचे गळयामध्ये अडकविण्याचा इशारा केल्या. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी रेकॉर्डरला असले लेसव्दारे तो गळयामध्ये अडकविला.



Scanned with OKEN Scanner

त्यानंतर मी तक्रारदार श्री. गायकवाड व पंच नं.1 श्री. नागरगोजे यांना तहसिल कार्यालय तासगाव येथे श्री.साळुंखे तलाठी यांची भेट घेणेकरीता रवाना होणे बाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार श्री.गायकवाड व पंच नं.1 श्री. नागरगोजे असे तक्रारदार यांचेकडील टीव्हीएस इलेक्टीक मोपेड क्र.एमएच-10-ईजे-8791 वरून रवाना झाले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. गायकवाड व पंच नं. 1 श्री. नागरगोजे असे आम्ही थांबलो त्या ठिकाणी परत आले. त्यावेळी मी तक्रारदार यांना त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून देण्याबाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार यंानी त्यंाचे गळ्यातील लेसच्या सहाय्याने अडकवलेला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून माझ्याकडे दिला. तो मी 16.02 वाजता बंद करुन सुरक्षिततेकरीता माझ्या ताब्यात घेतला. त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे पंच नंबर 1 हे आमचेकडील वाहनामध्ये बसले.

त्यानंतर मी, पंच नं 1 श्री. नागरगोजे यांना श्री.साळुंखे तलाठी यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं 1 यांनी हकीगत सांगीतली की, "आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील मो.सा वरून रवाना होवून तहसिल कार्यालय तासगाव दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार यांनी श्री.साळुंखे तलाठी यांचा तहसिल कार्यालयात शोध घेतला परंतू ते दिसून आले नसल्याने तक्रारदार यांनी श्री.साळुंखे तलाठी यांना फोन करून कार्यालयाचे पार्किंगमध्ये बोलावून घेतले. काही वेळाने एक इसम तक्रारदार यांचे जवळ येवून "गायकवाड तुम्हीचा का" अशी विचारणी केली. असता तक्रारदार यांनी "हो मीच" असे म्हणून चर्चा करू लागले. त्यावरून सदरचे अनोळखी इसम हे श्री.साळुंखे तलाठी असल्याचे माझी खात्री झाली. त्यानतर तक्रारदार यांनी तलाठी साळंुखे यांना त्यांचे नोंदीचे प्रकरण कोतवाल पवार यांना दिले असल्याचे सांगून नोंद लवकर मंजूर करण्याची विंनती केली. त्यावेळी तलाठी साळुंखे यांनी त्यांना ते इलेक्शन डयुटीमध्ये महिना झाले बाहेरच असून तलाठी कार्यालयामध्ये गेले नसल्याचे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी तलाठी साळुंखे यांना "त्यांनी हाय म्हणले सगळे ओके बर तरी नोंदणीला अंदाजे किती म्हणजे त्यांच त्यानी करत असतील तर करूदेत............मला संजुभाऊ काय म्हणले पंधरा हजार रूपये येतय" असे म्हणाले. त्यावर तलाठी साळुंखे यांनी "त्याच काय विषय न्हाय.....मी कागदपत्र चेक करतो.....या तुम्ही" असे म्हणून ते निघून गेले. त्यानंतर तक्रारदार यांनी बाजूस येवून कोणास तरी फोन लावला. त्यानंतर तक्रारदार व मी असे तहसिल कार्यालय तासगाव येथून रवाना होवून आपणासमक्ष हजर झालो" वगैरे हकीकत पंच नं.1 यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री.गायकवाड यांना पडताळणी कारवाईची हकिकत विचारली असता तक्रारदार यांनी पंच नं. 1 यांचे हकिकत प्रमाणे हकिकत सांगीतली. तसेच तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवरून तलाठी यांचे मो.क्र. 9665240881 यावर फोन केला असल्याचे व त्यानंतर सर्कल श्री. भांबुरे यांचे मो.क्र.9527696004 यावर फोन करून त्यांचे ठाव-ठिकाण्याबाबत विचारणा केली असता ते विटा येथे गेले असलेची हकीकत सांगितली. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी तक्रारदार श्री. गायकवाड व लोकसेवक श्री.साळुंखे तलाठी यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 003 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली. पडताळणी कारवाई मध्ये, श्री.साळुंखे तलाठी यांनी तक्रारदार यांना ते महिना झाले निवडणुकीच्या कामामध्ये व्यस्त असल्याने निवडणुक प्रक्रिया झालेनंतर त्यांचे नोंदीचे प्रकरण बघत असल्याचे सांगितल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर आम्ही सर्वानुमते लोकसेवक हे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुक प्रक्रियेमध्ये व्यस्त असल्याने निवडणुक प्रक्रिया पुर्ण झालेनंतर लोकसेवक श्री.साळुंखे तलाठी यांचेकडे पुन्हा पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर दि.29.01.2026 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करून त्याबाबतचा सविस्तर पंचानामा त्याच दिवशी दोन्ही पंचासमक्ष पुर्ण करण्यात आला. व दि.29.01.2026 रोजी वापरण्यात आलेले मेमरीकार्ड दोन्ही पंचासमक्ष सिंलबद करण्यात आले आहे.

दि. 20/02/2026 रोजी 12.24 वा चे सुमारास तक्रारदार श्री. बालाजी विष्णु गायकवाड, रा.शिरगाव, ता. तासगाव जि.सांगली यांनी आम्हास संपर्क करून त्यांचे प्रलंबित कामा संदर्भात संजय पवार यांची भेट घेणेकामी तलाठी कार्यालय शिरगाव येथे जाणार असल्याचे व सोमवार हा वार शिरगावसाठी राखीव असल्याने तलाठीची भेट होण्याची शक्यता असल्याचे सांगितले. त्यावेळी आम्ही तक्रारदार गायकवाड यांना दि.23/02/2026 रोजी 12.00 वा पर्यंत पथकासह विसापूर फाटा येथे येत असलेचे सांगून सदर ठिकाणी हजर राहणेच्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी दोन्ही पंच साक्षीदार यांना संपर्क करून दि.23/02/2026 रोजी 11.00 वा इकडील कार्यालयात हजर राहणेच्या सुचना दिल्या.

दि.23/02/2026 रोजी आम्ही कार्यालयात हजर असताना मी दिले सुचनेप्रमाणे दोन्ही पंच 11.30 वा चे सुमारास आमचे समक्ष हजर झालेत.



Scanned with OKEN Scanner

त्यानंतर मी, दोन्ही पंच, पोना/प्रितम चौगुले, पोकॉ/अजित पाटील व चालक रजपूत असे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, व्हिडीओ रेकॉर्डर, मेमरी कार्ड, लॅपटॉप, पिं्रटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, अंॅथ्रासिन पावडर, काळे रंगाचे कापड, साबण व इतर आवश्यक साहित्य घेऊन शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो नं. एमएच-10-डीक्यु-9530 मधून कार्यालयातून 11.45 वाजता रवाना होवून स्टेशन चौक, माधवनगर, बुधगाव, तासगाव मार्गे विसापूर फाटा येथे 13.00 वा चे सुमारास दाखल झालो. त्यानंतर मी तक्रारदार यांना संपर्क करून विसापूर फाटा येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे काही वेळाने तक्रारदार गायकवाड हे त्यांचेकडील टीव्हीएस इलेक्टीक मोपेड क्र. एमएच-10-ईजे-8791 वरून आमचे समक्ष हजर झालेत.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. गायकवाड यांना आमचेकडील वाहनात बसणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार हे आमचेकडील वाहनामध्ये बसले.

त्यानंतर आम्ही सर्वानुमते तक्रारदार श्री.गायकवाड यांनी दिले लाच मागणीचे तक्रारी अर्जाचे अनुषंगाने आजरोजी तलाठी श्री. साळुंखे यांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यामध्ये नविन एक मेमरीकार्ड घालून मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याचे खात्री करून दिली.

त्यानंतर मी श्री.साळुंखे तलाठी यांचा ठावठिकाणा निश्चित करण्यासाठी तक्रारदार यांचे मोबाईलवरून त्यांना संपर्क करून पडताळणी करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी 13.43 वाजता माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे पडताळणी कारवाई वेळचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये तसेच सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये फाईल क्रमांक आरईसी 001 ही सेव्ह असल्याच्या खात्री करून दिल्या.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. गायकवाड यांना दिले सुचनेप्रमाणे त्यांनी त्यांचे मोबाईलवरून श्री.साळुंखे तलाठी यांचे मो.क्र. 9665240881 यावर 13.53 वा चे सुमारास फोन करून फोन स्पिकर मोडवर घेतला. त्यावेळी श्री. साळुंखे तलाठी यांनी तक्रारदार यांचा कॉल स्विकारला नाही.

त्यानंतर काही वेळाने मी दिले सुचनेप्रमाणे तक्रारदार गायकवाड यांनी त्यांचे मोबाईल वरून श्री.साळुंखे तलाठी यांचे मोबाईलवर 13.58 वा चे सुमारास फोन करून फोन स्पिकर मोडवर घेतला. त्यावेळी श्री.साळुंखे तलाठी यांनी तक्रारदार यांचा कॉल रिसीव्ह केल्यानंतर लागलीच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 13.58 वा सुरू करून तक्रारदार यांचेसमोर धरला. त्यावेळी श्री.साळुंखे तलाठी यांनी तक्रारदार यांना ते शिरगाव तलाठी कार्यालयात असल्याचे सांगितल्याने तक्रारदार यांनी त्यांना 15 ते 20 मिनीटात येत असल्याचे सांगुन फोन कट केला. लागलीच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केला. त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये फाईल क्रमांक आरईसी 002 ही सेव्ह असल्याच्या खात्री करून दिल्या.

त्यानंतर मी तक्रारदार व पंच नं.1 नागरगोजे यांना श्री.साळुंखे तलाठी यांचेकडे शिरगाव तलाठी कार्यालय येथे पाठवून त्यांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. गायकवाड व पंच क्र.1 चंद्रकांत नागरगोजे यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 14.12 वाजता सुरु करुन तक्रारदार गायकवाड यांचेकडे देवून तो त्यांचे गळयामध्ये अडकविण्याचा इशारा केल्या. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी रेकॉर्डरला असले लेसव्दारे तो गळयामध्ये अडकविला.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. गायकवाड व पंच नं.1 श्री. नागरगोजे यांना तलाठी कार्यालय शिरगाव येथे श्री.साळुंखे तलाठी यांची भेट घेणेकरीता रवाना होणे बाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार श्री.गायकवाड व पंच नं.1 श्री. नागरगोजे असे तक्रारदार यांचेकडील टीव्हीएस इलेक्टीक मोपेड क्र.एमएच-10-ईजे-8791 वरून रवाना झाले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. गायकवाड व पंच नं.1 नागरगोजे असे आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो मी 15.28 वाजता बंद करून माझे ताबेत घेतला.

त्यानंतर मी, पंच नं 1 श्री. नागरगोजे यांना श्री.साळुंखे तलाठी यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं 1 यांनी हकीगत सांगीतली की, "आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील मो.सा वरून रवाना होवून शिरगाव तलाठी कार्यालय येथे दाखल झालो. त्यावेळी तलाठी कार्यालयात लोकांची वर्दळ असल्याने आम्ही काही वेळ तेथे थांबून राहिलो. त्यानंतर तक्रारदार यांनी कोतवाल संजय पवार यांची भेट घेवून त्यांना त्यांचे नोंदीचे प्रकरण तलाठी साळुंखे यांना दाखविण्याची विंनती केली. त्यावेळी काही वेळाने संजय पवार यांनी त्यांचे नोंदीचे प्रकरण तलाठी सांळुखे यांना दिले. त्यावेळी तक्रारदार यांनी साळुंखे तलाठी यांची भेट घेवून त्यांचेशी नोंदीचे कामा संदर्भात चर्चा केली. त्यावेळी तक्रारदार यांनी तलाठी



Scanned with OKEN Scanner

साळुंखे यांना बाजूस येण्याची विंनती केली असता तलाठी साळुंखे यांनी "मागन तुम्हाला फोन करून नोटीस काढतो आम्ही..... नोटीस काढल्यावर या" असे म्हणाले.

त्यानंतर तक्रारदार यांनी संजय पवार यास बाजूस बोलावून घेवून त्यास "किती परत फायनल सांगा? असे विचारले असता, संजय पवार यांनी "दहा करून टाका आणी मोकळ व्हा" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी त्यास "दहा हजार?" असे विचारले असता, संजय पवार यांनी "ह.... विषय संपवुन टाका" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "ठिक हाय जाऊ का हे बघा मी आर्धा पाऊन तासन येतो विषय संपवुन जातो" असे म्हणून तक्रारदार व मी असे तलाठी कार्यालय शिरगाव येथून रवाना होवून आपणासमक्ष हजर झालो" वगैरे हकीकत पंच नं. 1 यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री.गायकवाड यांना पडताळणी कारवाईची हकिकत विचारली असता तक्रारदार यांनी पंच नं. 1 यांचे हकिकत प्रमाणे हकिकत सांगीतली.

त्यानंतर तक्रारदार श्री. गायकवाड, श्री.साळुंखे तलाठी व संजय पवार, कोतवाल यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 003 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.

पडताळणी कारवाईमध्ये, संजय पवार कोतवाल यांनी तक्रारदार यांनी रिकन्व्हीयन्स पत्राव्दारे खरेदी केलेल्या जमिनीची नोंद तलाठीस सांगून 7/12 सदरी लावण्यासाठी स्वत:करीता तक्रारदार यांचेकडे 10,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर मी सापळा कारवाई करीता अंमलदार पोह/रामहरी वाघमोडे व पोशि/चंद्रकांत जाधव यांना संपर्क करून विसापूर फाटा येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या.

काही वेळाने अंमलदार पोह/रामहरी वाघमोडे व पोशि/चंद्रकांत जाधव हे त्यांचेकडील शासकीय मो.सा.ने विसापूर फाटा येथे आमचे समक्ष हजर झाले.

त्यानंतर आम्ही श्री.संजय पवार, कोतवाल यांचेविरूध्द सापळा कारवाई आयोजित करण्याचे सर्वानुमते निश्चित केले. त्यानंतर मी तक्रारदार श्री.गायकवाड यांना लोकसेवक श्री. संजय पवार, कोतवाल यांनी मागणी केलेली 10,000/- रूपये हजर करण्यास सांगितले.

त्यावेळी तक्रारदार गायकवाड यांनी त्यांचेकडील 500/- रूपये दराचे 20 नोटा असे एकुण 10,000/- रूपये आमचे व दोन्ही पंचांसमक्ष हजर केले. त्यानंतर मी सापळा पथकातील अंमलदार यांचेकरवी तक्रारदार यांनी हजर केलेली 10,000/- रूपये रक्कमेच्या नोटांचे नंबर एका को-या कागदावर लिहून घेतले. त्यावर मी, दोन्ही पंच व तक्रारदार यांनी सहया केल्या.

त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली.

त्यानंतर मी तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार पोशि/चंद्रकांत जाधव यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटांची घडी करून तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजवे खिश्यामध्ये ठेवली व आम्ही सापळापुर्व कारवाई पुर्ण केली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. गायकवाड, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. तसेच पथकातील अंमलदार पोशि/चंद्रकांत जाधव यांना विसापूर फाटा येथे थांबणेचे सुचना देवून त्यांना सापळा कारवाईतून वगळण्यात आले. तसेच मी पथकातील अंमलदार पोकॉ/पाटील यांना त्यांचेकडील हॅन्डीकॅममध्ये लोकसेवक यांचेकडून लाच रक्कम जप्तीबाबत व्हिडीओ चित्रीकरण करणेबाबतच्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी, तक्रारदार व दोन्ही पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामधील पडताळणी कारवाई वेळचे मेमरीकार्ड काढून माझे ताबेत घेवून त्यामध्ये एक नविन मेमरीकार्ड घातले.

त्यानंतर मी 16.22 वाजता सापळा कारवाईचे माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे निवेदन डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये व सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले आहे. त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये फाईल क्रमांक आरईसी 001 ही सेव्ह असल्याच्या खात्री करून दिल्या.

तसेच मी तक्रारदार यांना लोकसेवक श्री. संजय पवार, कोतवाल यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतर हातरूमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करणेबाबतच्या सुचना दिल्या.

त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 16.35 वाजता सुरू करून तो तक्रारदार यांना त्यांचे गळयामध्ये अडकविणेच्या इशारा केला त्याप्रमाणे तक्रारदार श्री. गायकवाड यांनी रेकॉर्डरला असले लेसव्दारे तो गळयामध्ये अडकवून श्री.संजय पवार यांची भेट घेण्याकरीता रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. गायकवाड



Scanned with OKEN Scanner

व पंच नं. 1 श्री. नागरगोजे असे तक्रारदार यांचेकडील टीव्हीएस इलेक्टीक मोपेड क्र.एमएच-10-ईजे-8791 वरून रवाना झालेत.

त्यांचे पाठोपाठ मी, पंच नं. 2 श्री. भंडारे, पोशि/अजित पाटील असे लॅपटॉप, प्रिंटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, काळे रंगाचे कापड व इतर आवश्यक साहित्य घेऊन शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो नं. एमएच-10-डीक्यु-9530 मधून व पोह/वाघमोडे व पोना/प्रितम चौगुले त्यांचेकडील शासकीय मो.सा. वरून रवाना झाले. पोशि/चंद्रकांत जाधव हे विसापूर फाटा येथे सुटकेससह थांबून राहिले.

तक्रारदार यांनी त्यांची मो.सा. तासगाव ते विटा जाणारे रोडने शिरगाव गावामधून घेवून तलाठी कार्यालयाचे कंपाऊंडचे बाहेर मो.सा. पार्क केली. लागलीच आम्ही व सापळा पथक असे तक्रारदार व पंच नं.1 नागरगोजे हे थांबले ठिकाणापासून काही अंतरावर आमची वाहन पार्क करून आजुबाजूस सापळा लावून थांबून राहिलो.

काही वेळाने तक्रारदार व पंच नं.1 तलाठी कार्यालयामधून बाहेर मो.सा. जवळ चालत आलेचे दिसले. त्यावेळी 1 अनोळखी इसमाने तलाठी कार्यालय बंद करून कार्यालयाचे बाहेर थांबले दुस-या अनोळखी इसमाजवळ आले व ते दोन्ही अनोळखी इसम आप-आपले मो.सा. वरून बसून निघून गेलेचे दिसले.

त्यावेळी मी व सापळा पथक असे थोडा वेळ वाट पाहून तक्रारदार यांनी कोणताही इशारा न केल्याने तक्रारदार यांचेजवळ जावून त्यांचेडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो 17.02 वा चे सुमारास बंद करून माझे ताबेत घेतला.

त्यावेळी तक्रारदार श्री. गायकवाड यांनी आम्हास श्री.संजय पवार यांनी लाचेची मागणी करून लाच रक्कम त्यांचे टेबलवर ठेवण्यास सांगितल्याने लाच रक्कम त्यांचे टेबलवर ठेवली असल्याची हकीकत सांगीतली. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना लोकसेवक यांनी लाच रक्कम स्विकारलेबाबत इशारा का केला नाही? याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी संजय पवार यांनी त्यांचे हाताने लाच रक्कम स्विकारली नसल्याने इशारा केला नसल्याचे सांगितले. तसेच संजय पवार हे विसापूर मंडळ अधिकारी कार्यालय येथे गेले असल्याची हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही व सापळा पथक असे आमचेकडील वाहनाने शिरगाव येथून रवाना होवून विसापूर मंडळ अधिकारी कार्यालय येथे दाखल झालो.

त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे 17.42 वा चे सुमारास पोह/वाघमोडे व पोना/चौगुले यांनी संजय पवार यांचे दोन्ही होत मनगटाजवळ घट्ट पकडले. त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे पोशि/अजित पाटील यांनी त्यांचेजवळील हॅन्डीकॅममध्ये व्हीडीओ शुटींग सुरु केले. त्यावेळी मी संजय पवार यांना माझी ओळख सांगून त्यांना लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता त्यांनी लाच रक्कम त्यांचे शिरगाव तलाठी कार्यालयाचे टेबलवर असल्याचे सांगितले. व कार्यालयास कुलूप लावून त्याची चावी स्वत:कडे असल्याचे सांगितले. त्यावेळी मी दिले सुचनेप्रमाणे पंच नं.2 यांनी संजय पवार यांचे खिश्यातील शिरगाव तलाठी कार्यालयाचे चावी त्यांचे ताबेत घेतली. त्यानंतर मी विसापूर मंडल अधिकारी कार्यालयात जरूर तो अंधार करून अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात संजय पवार यांचे हाताची तपासणी केली असता त्यांचे हातावर अॅन्थ्रॉसिन पावडरची चकाकी दिसून आली नाही. सदर कार्यवाहीचे पोकॉ/पाटील यांनी सलग त्यांचेकडील सोनी हॅन्डीकॅममध्ये व्हीडीओ चित्रीकरण केले आहे.

त्यानंतर मी श्री.संजय पवार यांना त्यांचे पूर्ण नांव, वय, हुद्दा, पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. संजय शंकर पवार, वय - 56 वर्षे, व्यवसाय - खाजगी इसम, रा. शिरगाव, विसापूर ता.तासगाव जि.सांगली असे असल्याचे सांगितले. त्यावेळी संजय पवार हे कोतवाल म्हणून नेमणुकीस नसून ते खाजगी इसम म्हणून तलाठी कार्यालय शिरगाव येथे काम करीत असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही श्री.संजय पवार, खाजगी इसम यांना ताबेत घेवून आमचेकडील शासकीय वाहनाने विसापूर मंडळ अधिकारी कार्यालय येथून रवाना होवून तलाठी कार्यालय शिरगाव येथे दाखल झालो.

त्यानंतर मी पंच नं.2 भंडारे यांना दिले सुचनेप्रमाणे त्यांनी संजय पवार यांचे ताबेतून घेतले चावीने तलाठी कार्यालय उघडून आम्ही व सापळा पथक कार्यालयामध्ये गेलो. त्यावेळी संजय पवार यांनी लाच रक्कम त्यांचे टेबलवरील एका पेपरच्या खाली ठेवली असल्याचे दाखविले. त्यावेळी मी दिले सुचनेप्रमाणे पंच नं.2 भंडारे यांनी संजय पवार खाजगी इसम यांचे टेबलवरील पेपर उचलला असता पेपरच्या खाली 500/- रू दराच्या चलनी नोटा मिळून आल्या. त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे पंच नं.2 भंडारे यांनी 500/- रूपये दराच्या नोटांची तपासणी केली असता सदर नोटांचे क्रमांक हे तक्रारदार यांनी सापळापुर्व कारवाईवेळी हजर केलेल्या नोटांचे क्रमांकाचेच असलेचे निष्पन्न झाले. त्यानंतर जरूर तो अंधार करून अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात लाच रक्कमेच्या वरील कागदांची, लाच रक्कमेची व लाच रक्कम ज्या कागदावर ठेवला त्या कागदाची तपासणी केली असता लाच रक्कमेच्या वरील कागदावर, लाच रक्कमेस व लाच रक्कम ज्या कागदावर ठेवली त्या कागदावर ठिक-ठिकाणी अॅन्थ्रॉसिन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. त्यानंतर मी संजय पवार, खाजगी इसम यांना तक्रारदार यांचे प्रलंबित कामाची



Scanned with OKEN Scanner

कागदपत्रांबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे टेबलवरील तक्रारदार गायकवाड यांचा 7/12 नोंदीचा अर्ज व कागदपत्रे पंचासमक्ष हजर केलेने सदरची कागदपत्रे आम्ही ताबेत घेतली.
त्यानंतर आम्ही गोपनीयतेच्या दृष्टीने व कारवाईच्या सोईकरीता शासकीय विश्रामगृह तासगाव येथे जाणेचे निश्चित केले. त्यानंतर आम्ही श्री.संजय पवार, खाजगी इसम यांना घेवून शिरगाव तलाठी कार्यालय येथून 18.30 वा चे सुमारास रवाना होवून 19.00 वा शासकीय विश्रामगृह तासगाव येथे दाखल झालो.
त्यानंतर मी पंच नं. 1 श्री. नागरगोजे यांना सापळ्याची सविस्तर हकीकत सांगण्यास सांगितली असता पंच नं. 1 यांनी सापळ्याची हकीकत सांगितली की, "मी व तक्रारदार असे त्यांचेकडील मो.सा वरून रवाना होवून शिरगाव तलाठी कार्यालय येथे दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार व मी असे मो.सा. पार्क करून कार्यालयामध्ये गेलो. त्यावेळी तक्रारदार यांनी संजय पवार यांची भेट घेवून त्यांचे नोंदीचे कामा संदर्भात चर्चा केली. त्यावेळी संजय पवार यांनी तक्रारदार यांचेकडे हाताचा अंगठा तर्जनीवर घासून हाताने इशारा करून लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी त्यांचे पॅन्टचे समोरील उजवे खिश्यामध्ये ठेवली लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने बाहेर काढून "मोजून घ्या बरोबर" असे म्हणून संजय पवार यांचे समोर धरली असता संजय पवार यांनी "त्याला काय मोजायच हाय....आपलच हाय" असे म्हणाले व त्यांनी टेबलावर असले कागदाकडे बोट करून "ठेव तिथ" असे म्हणून तक्रारदार यांना लाच रक्कम टेबलावरील कागदावर ठेवण्यास सांगितली. त्यावेळी तक्रारदार यांनी लाच रक्कम टेबलवरील एका कागदावर ठेवली. त्यानंतर संजय पवार यांनी लाच रक्कमेवर एक कागद ठेवून त्यांनी ते विसापूर येथे सर्कल ऑफीसला कामानिमीत्त जात असल्याचे सांगून आम्ही कार्यालयाचे बाहेर आलो. त्यावेळी तक्रारदार व मी असे मो.सा.जवळ आलो. त्यावेळी संजय पवार यांनी कार्यालय बंद केले. त्यावेळी कार्यालयाचे बाहेर थांबले तलाठी श्री.साळुंखे हे त्यांचे मो.सा. वरून व संजय पवार हे त्यांचेकडील बुलेट मो.सा. वरून विसापूर गावचे दिशेने रवाना झाले. त्यानंतर तक्रारदार व मी असे तेथून रवाना झालो" वगैरे हकीकत पंच नं.1 यांनी सांगितली.
त्यानंतर मी तक्रारदार श्री. गायकवाड यांना सापळा कारवाईची हकीकत विचारली असता त्यांनी पंच नं.1 नागरगोजे यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पुढील कार्यवाही शासकीय विश्रामगृह तासगाव येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी दि. 29/01/2026 रोजीचे पडताळणी कारवाई दरम्यान श्री. संजय शंकर पवार, खाजगी इसम, वय 56, रा.शिरगाव ता.तासगाव जि.सांगली यांनी आपले यांनी तलाठी कार्यालय शिरगाव येथे भ्रष्ट व गैरमार्गाने स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता तक्रारदार यांनी रिकन्व्हीयन्स पत्राव्दारे खरेदी केलेल्या दस्ताची नोंद तलाठी शिरगाव यांना सांगून मंजूर करण्याकरीता तक्रारदार यांचेकडे 15,000/- रूपये लाचेची मागणी केली.
त्यानंतर दि.23/02/2026 रोजीचे पडताळणी कारवाईवेळी श्री. संजय शंकर पवार, खाजगी इसम, वय 56, रा. शिरगाव ता.तासगाव जि.सांगली यांनी तलाठी कार्यालय शिरगाव येथे भ्रष्ट व गैरमार्गाने स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता तक्रारदार यांनी रिकन्व्हीयन्स पत्राव्दारे खरेदी केलेल्या दस्ताची नोंद तलाठी शिरगाव यांना सांगून मंजूर करण्याकरीता स्वत:करीता तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती 10,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.
त्यानंतर लागलीच श्री.संजय शंकर पवार, खाजगी इसम यांचेविरूध्द तलाठी कार्यालय शिरगाव येथे सापळा कारवाई केली असता श्री.संजय पवार, खाजगी इसम यांनी तक्रारदार यांची रिकन्व्हीयन्स पत्राव्दारे खरेदी केलेल्या दस्ताची तलाठी शिरगाव यांचेकडून नोंद करून घेण्यासाठी स्वत: करीता तक्रारदार यांचेकडे 10,000/- रूपये लाचेच्या रक्कमेची मागणी करून लाच रक्कम त्यांचे तलाठी शिरगाव या कार्यालयातील टेबलवर ठेवण्यास सांगून भ्रष्ट मार्गाने स्वत:चा आर्थिक फायदा मिळविला आहे. म्हणुन माझी श्री. संजय शंकर पवार, वय - 56 वर्षे, व्यवसाय - खाजगी इसम, रा. शिरगाव, ता.तासगाव जि.सांगली यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिंबध कायदा 1988 (सुधारणा 2018) चे कलम 7 अ प्रमाणे सरकारतर्फे फिंयाद आहे.
माझा वरील फिंयादी जबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो पिंट्रट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

**समक्ष** हा दिला वर्दीजबाब,



Scanned with OKEN Scanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

PRADIP BALASO SURYAWANSHI(I (Inspector)) / DGPPBSM7901 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): PRADIP BALASO
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPPBSM7901

पोलीस स्टेशन ऑफिसर
नासगांव पोलीस ठाणे
HC1380



Scanned with OKEN Scanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned with OKEN Scanner